| MHSN060022412025 | R.C.S. 171/2025<br>Vitthal Rajaram Pawar Vs. Sajjan Ishwara Pawar |
| --- | --- |

## निशाणी ५ खालील आदेश

१. वादीने दाखल केलेला तुर्तातुर्त मनाई अर्ज, प्रतिज्ञापत्र आणि कागदपत्रे यांचे अवलोकन केले.

२. वादीतर्फे वकिल श्री. आर. आर. सोनावले यांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादी याचे असे कथन आहे की, रे.दि.मु. नं. ३१०/२०२४ या दाव्यात झालेल्या आपसात तडजोडीप्रमाणे दाव्यामध्ये नमूद केलेली मिळकत ही वादी यांच्या हिश्यास आलेली असून तेंव्हापासून सदर मिळकतीमध्ये वादी यांचा प्रत्यक्ष कब्जा असून वादी हे सदरची मिळकत कसत आहेत. यातील वादीचे कथन असे आहे की, यातील प्रतिवादी हे नेहमी वादीच्या कब्जेवहिवाटीस तसेच दावा मिळकतीची मशागत करणेस पिक, पाहणी घेणेस नेहमी हरकत अडथळा करीत असतात. त्यानंतर वादीचे पुढे असे कथन आहे की, दिनांक ०४.०६.२०२५ रोजी प्रतिवादी यांनी वादी यांच्या शेतामध्ये जाऊन त्यांचा ट्रक्टर अडविला व तसेच वादी यास तुमचा शेताशी काही संबंध नाही. मशागत केली तर मारेन अशी धमकी दिली. त्यामुळे वादी यांनी प्रसतुतचा दावा दाखल केला असून एकतर्फा तुर्तातुर्त मनाई मिळणेविषयी विनंती केली आहे. वादीचे एकंदरीत कथन पाहता वादी हा दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाटीस असून सदरची मिळकत ही वादी यास आपसात तडजोडीप्रमाणे हिश्यास आल्याचे वादीचे कथन आहे. तसेच प्रतिवादी यांची मिळकत वादमिळकतीच्या क्षेत्रालगत असल्याने प्रतिवादी हे वादी याचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत असल्याचे वादीचे कथन आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाचे कामी कोणताही आदेश पारीत करणेपूर्वी प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकुन घेणे आवश्यक असे वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादीना कारणे दाखवा नोटीस काढणेत यावी.

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.07.17 11:41:15 +0530

मिरज (अनिरुध्द एस. राणे)
दिनांक १६.०७.२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज